ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २३ • पुणें, बुधवार तारीख १३ नोव्हेंबर, १९५७ अंक ४२

## विविध माहिती

**विश्वकिरणांचा प्राण्यांवर परिणाम**—ग्रहगोलांतर्गत प्रवासाविषयींची एक परिषद रशिअन शास्त्रज्ञांनीं भरविली होती. ह्या परिषदेंत अशी माहिती सांगण्यांत आली कीं सचेतन प्राण्यांवर विश्वकिरणांचा काय परिणाम होतो त्यासंबंधीं माहिती गोळा करण्यासाठीं रशिअन शास्त्रज्ञ उडत्या फुग्यासारख्या साधनांचा उपयोग करून अंतराळांत १२५ मैल उंचीपर्यंत प्राणी धाडत असतात.

**कॉंग्रेस पगारी माणसें नेमणार**—गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत ज्या मतदारसंघांतून कॉंग्रेसचा उमेदवार निवडून आला आहे, अशा प्रत्येक मतदारसंघांत अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी पगारी कॉंग्रेस प्रचारक नेमण्याचा विचार करीत असल्याचें समजतें. मतदारसंघांतील मतदारांच्या प्रश्नांची कमिटीला माहिती देणें आणि कॉंग्रेसचा प्रचार करणें हीं कामें प्रचारकांना करावीं लागतील.

**सूर्यकिरणांच्या साह्यानें वीज**—अर्मीनिया ह्या उपराज्यांत रशिया सूर्यकिरणांच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचें जगांतील पहिलें केंद्र उभारीत आहे. ह्या केंद्रांत सूर्यप्रकाशाच्या प्रखरतेचा उपयोग करून घेऊन दरसाल सुमारें २५ लाख किलोवॅट वीज उत्पन्न करण्यांत येईल. १,३०० आरसे वापरून पाण्याची वाफ करण्यांत येईल व मग तीवर टर्बाइन चालविण्यांत येईल.

**अमेरिकेचें जपानला कर्ज**—अमेरिकेच्या निर्यात-आयात बॅंकेनें जपानला ६ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केल्याचें जाहीर केलें आहे. अमेरिकेचा कापूस जपानला विकत घेतां यावा म्हणून कर्ज देण्यांत आलें आहे. जपानच्या कापडाची किंमत त्यामुळें वाढण्याचा संभव आहे, असें म्हणतात.

**विनोबाजींचा स्त्रियांना उपदेश**—आचार्य विनोबा भावे म्हैसूर येथें प्रार्थनेनंतरच्या सभेंत बोलतांना म्हणाले कीं, पुरुषांकडून स्त्रियांना ज्या बांगड्या अगर जवाहीर देण्यांत येतें त्यांना स्त्रियांनीं अलंकार समजूं नये. उलट, त्यांना घराबाहेर न पडतां घरांतच राहवें म्हणून त्यांच्या हातांत घातलेल्या ह्या हातकड्याच आहेत असें समजावें. ह्या बेड्यांपासून स्त्रिया मुक्त झाल्याशिवाय शांततामय समाज निर्माण होणार नाहीं.

**रेल्वेप्रवाशांना अन्नाचे पुडे**—रेल्वेनें प्रवास करणाऱ्या लोकांना मोठ्या स्टेशनावरून अन्नाचे पुडे विकण्याचा विचार रेल्वेचे अधिकारी करीत आहेत. कांहीं गाड्यांतून असणाऱ्या जेवणाच्या डब्याचा फारसे प्रवासी फायदा घेत नसल्याचें आढळून आल्यामुळें ह्या नव्या उपक्रमाचा विचार होत आहे. अन्नाचे पुडे सर्व वर्गांच्या प्रवाशांना विकण्याचा विचार आहे.

**रक्तदान करणाऱ्यांना मोबदला**—मद्रास राज्यांत रक्तदान करणाऱ्या लोकांना एका वेळीं ५ रुपये देण्यांत येत असत. आतां ह्या मोबदल्यांत वाढ करून तो ७ रुपये करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें, रक्तदान करणाऱ्या माणसाला चहा, कॉफी, बिस्किटें, इत्यादि उपहार देण्यासाठींहि दरमाणसीं १ रुपया मंजूर करण्यांत आला आहे.

**लिनोलिअमचें उत्पादन वाढत आहे**— भारतामधील लिनोलिअमचें उत्पादन हळुहळू वाढत आहे. १९५७ च्या पहिल्या सात महिन्यांत १,८३,२०० वार लिनोलिअम निर्माण करण्यांत आलें. गेल्या वर्षीं ह्याच कालांत १,६७,३०० वार लिनोलिअम निर्माण करण्यांत आलें होतें. १९५६ चें एकूण उत्पादन १९५५ च्या उत्पादनापेक्षा सुमारें २० हजार वारांनीं अधिक झालें.

**बंदरांच्या सुधारणेसाठी कर्ज**—भारतामधील चार मोठीं बंदरें अधिक कार्यक्षम करण्यासाठी व त्यांची सुधारणा करण्यासाठी भारत सरकारनें जागतिक बॅंकेकडे कर्ज मिळविण्यासंबंधीं विचारणा केली आहे. ह्या बाबतींत सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठी जागतिक बॅंकेचें एक प्रतिनिधिमंडळ दिल्ली येथें आलें आहे. मंडळांत तीन प्रतिनिधी असून त्यांत रॉटरडॅम येथील बंदराचे मुख्य एंजिनिअर हे प्रमुख आहेत.

**चित्रपट-निर्मात्यांना इषारा**—ब्रिटिश स्क्रीन अँड टेलिव्हिजन असोसिएशनचे आंतरराष्ट्रीय चिटणीस मि. पॉल टॅबोरी ह्यांनीं मुंबई येथें चित्रपट-लेखकांशीं बोलतांना असा इषारा दिला कीं, भारतीय चित्रपटांचे विषय अधिक व्यापक असतील तर जागतिक बाजारपेठांत तें स्थान मिळवूं शकतील. भारतीय चित्रपटांतील कांहीं नट व नटी ह्यांच्या अभिनयांतील अतिशयोक्तिबद्दल त्यांनीं नापसंति व्यक्त केली.

**स्वित्झरलंडमधील स्त्रियांना मतदानाचा हक्क**—स्वित्झरलंडच्या सरकारनें स्त्रियांना संघराज्याच्या निवडणुकीस उभें रहाण्याचा व त्यावेळीं मतें देण्याचा हक्क असणारें बिल वरिष्ठ सभागृहापुढें मांडलें होतें. सभागृहाच्या ३५ सभासदांपैकी २१ जणांनीं बिलाला अनुकूल मतें दिलीं व १४ जणांनीं विरोधी मतें दिलीं. त्या देशाच्या इतिहासांत स्त्रियांना हा हक्क प्रथमच मिळत आहे.

**कॉंपौंडर्सना डॉक्टरी धंदा करण्याची परवानगी**—काश्मिरच्या सरकारनें कॉंपौंडर्सना वैद्यकीय धंदा करण्याची परवानगी देण्याचा विचार चालविला आहे. काश्मीरमध्यें डॉक्टर्सचा तुटवडा असल्यामुळें धंद्यासंबंधींचा कायदा दुरुस्त करून ही सोय करण्यांत येणार आहे.

## जगांतील सर्वांत मोठें विमान

रशिआच्या तांत्रिक प्रगतीविषयीं पाश्चात्य राष्ट्रांतून बहुधा शंका व्यक्त करण्यांत येत असतात. पण गेल्या कांहीं दिवसांत ह्या शंका खोट्या ठरल्या आहेत. पृथ्वीभोंवतीं फिरणारे दोन उपग्रह अंतराळांत फेंकून रशिआनें अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रालाहि जबर धक्का दिला आहे. वैमानिक वहातुकीच्या बाबतींतहि रशिआनें जलद प्रगति केली असल्याचें दिसत आहे. रशिअन हवाई एंजिनिअरांनीं जगांतील सर्वांत मोठें उतारूंची वहातूक करणारें विमान बांधलें आहे. त्याचा वेगहि इतर कोठल्याहि विमानापेक्षा अधिक आहे. विमानाची बांधणी रशिअन क्रांतीचा ४० वा वाढदिवस साजरा करण्यासाठी करण्यांत आली आहे. छोट्या अंतराचा प्रवास असेल तर ह्या विमानांत २२० उतारू बसूं शकतील. तथापि, विमानाचें वैशिष्ट्य त्याच्या आर्थिक बाजूंत आहे. विमान बांधणाऱ्या तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, विमानांत बसूं शकणाऱ्या उतारूंची संख्या, त्याचा पल्ला व वेग ह्यांच्यामुळें भाड्याचा आकार बराच कमी होण्याची शक्यता आहे. अशा मोठ्या विमानांमुळें वैमानिक प्रवासाचे भाड्याचे दर रेल्वेच्या दराइतके खालीं येतील असें ह्यांचें मत आहे. ह्या विमानांत सामान्यपणें १७० प्रवासी बसूं शकतील. दोन खंडांत प्रवास करावयाचा असेल तर मात्र १२० प्रवाशांचीच सोय होऊं शकेल. हजार मैलांच्या आंतील प्रवास मात्र ते २२२ प्रवासी घेऊन करूं शकेल. विमानांत प्रवाशांच्या खाण्यापिण्याची सोय करण्यासाठीं एक रेस्टॉरंट आहे. त्यांत ४८ प्रवासी एका वेळीं बसूं शकतील. एकावर एक अशीं दोन स्वयंपाकगृहें असून तीं विजेच्या पाळण्यानें जोडण्यांत आलीं आहेत.

---

## ओरिसामधील कोळशाच्या खाणींचा विकास

ओरिसामधील कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठीं भारत सरकार आणि जपान ह्यांच्या दरम्यान करार होणार असल्याचें समजतें. भारताला परदेशीय हुंडणावळीची टंचाई भासत आहे आणि आणखी कांहीं वर्षें ती तशीच भासत राहणार असें दिसतें. ह्या दृष्टीनें, असा करार झाल्यास तो भारताला हितावह ठरणार आहे. कारण कराराची अंमलबजावणी सुरू झाल्यावर भारताला दरसाल ४० कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ मिळूं लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. उभयतां देशांच्या दरम्यान लोखंडाच्या खाणींचा विकास करण्याची जी योजना ठरेल तीमुळें जपानला दरसाल ६० लाख टन अशुद्ध अवस्थेंतील लोखंड पुरविण्यांत येईल. जपान दरसाल सुमारें ८० लाख टन अशुद्ध लोखंड परदेशाकडून आयात करतें. म्हणजे, भारताशीं करार झाल्यावर जपानच्या पोलादाच्या कारखान्यांना लागणाऱ्या अशुद्ध लोखंडाचा बहुतेक पुरवठा भारताकडून होऊं लागेल. जपान ओरिसामधील लोखंडाच्या खाणीं चालू करण्यासाठीं, विशाखापट्टम् येथील बंदराची सुधारणा करण्यासाठीं आणि तेथून लोखंडाच्या खाणींच्या भागापर्यंत रेल्वे बांधण्यासाठीं कांहीं खर्च करणार आहे. ह्या सर्व कार्यक्रमाला १५ ते २५ कोटी रुपयांपर्यंत भांडवली खर्च लागेल असा अंदाज आहे. येत्या डिसेंबरमध्यें ह्या कामासाठीं जपानी तंत्रज्ञांचा एक संघ भारतांत येणार आहे. भारतामधील लोखंडाच्या खाणी शोधून त्या चालू करण्यासाठीं अशाच प्रकारची मदत युगोस्लाव्हिआ, पोलंड व झेकोस्लोव्हाकिआ ह्या देशांनीं देऊं केली आहे. भारतानें दरसाल १५ लाख टन अशुद्ध लोखंड जपानला देण्याचा करार पूर्वींच केला आहे.

## श्री. अण्णासाहेब मराठे यांचें निधन

'बिजली प्रॉडक्टस्' या विजेचे दिवे करणाऱ्या पहिल्या भारतीय कारखान्याचे संस्थापक व इंजिनिअर श्रीयुत स. गो. ऊर्फ अण्णासाहेब मराठे हे दि. ८ रोजीं डॉ. कोयाजी यांच्या रुग्णालयांत निधन पावले. निधनसमयीं त्यांचें वय ६६ वर्षांचें होतें.

१९२२ सालीं बी. ई. झाल्यानंतर 'रानडे ब्रदर्स कॉन्ट्रॅक्टर्स' या सुप्रसिद्ध फर्मचे ते भागीदार बनले. विजापूर जिल्ह्यांतील कृष्णेवरील पूल, गुंटकल–बेझवाडा या रेल्वेमार्गावरील नंद्याळ घाटाचें संपूर्ण काम आणि जी. आय्. पी. रेल्वेचीं अनेक कामें त्यांनीं केलीं.

बिजली प्रॉडक्टस् व भारत पेनसिल्स् हा शिसपेन्सिलींचा कारखाना प्रस्थापित करण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला. बँक ऑफ महाराष्ट्राच्या संस्थापकांत ते एक प्रमुख होते व पुढें ते बँकेचे उपाध्यक्षहि होते. किर्लोस्कर ब्रदर्स व किर्लोस्कर ऑईल एजिन्स या कंपन्यांचे ते संचालक होते. सांगली येथील इंजिनिअरिंग कॉलेज चालविणाऱ्या महाराष्ट्र टेक्निकल सोसायटीचे ते उपाध्यक्ष होते.

---

**परभणी येथें शेतकी कॉलेज**—मराठवाड्यामध्यें परभणी येथें शेतकी कॉलेज स्थापन करण्यासाठीं मुंबई सरकारनें ४० लाख रुपये मंजूर केले आहेत. कॉलेज स्थापन करण्याची कल्पना पूर्वीच्या हैदराबाद सरकारची आहे. पण आतां तें चालविण्याची जबाबदारी पुनर्रचित मुंबई सरकारनें घेतली आहे. मंजूर झालेल्या रकमेपैकी २८ लाख रुपयांची रकम एकदांच खर्च होण्यापैकी आहे.

**राजकोट येथें वाचनालय**—सौराष्ट्रांतील प्रत्येक जिल्ह्यांत एक मोठें वाचनालय उघडण्याचें पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारनें ठरविलें होतें. त्यास अनुसरून मुंबई सरकारच्या शिक्षणमंत्र्यांनीं राजकोट येथें एका वाचनालयाचें उद्घाटन केलें. ह्या वाचनालयांत २५,००० पुस्तकें आहेत. उद्घाटनप्रसंगीं बोलतांना, मंत्र्यांनीं बदलत्या जगाची माहिती होण्यासाठीं विस्तृत वाचनाची आवश्यकता प्रतिपादन केली.

**नवीन इंधनाचा उपयोग**—रशिआनें अंतराळांत जे दोन उपग्रह फेकले आहेत त्यांच्या उड्डाणासाठीं शास्त्रज्ञांनीं नव्या प्रकारचें इंधन वापरलें असावें, असा तर्क करण्यांत आला आहे. हा तर्क खरा असेल तर रशिआच्या ५,००० मैल पल्ल्याच्या अग्निबाणाचा आकार फारसा मोठा असणार नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—मद्रास सरकारच्या सार्वजनिक बांधकामखात्यानें उटकमंडपासून ५ मैलांवर कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठीं जागा निवडली आहे. ही जागा म्हैसूर–उटकमंड रस्त्यावर असून तिचें क्षेत्रफळ ४०० चौरस एकर आहे. जागेच्या निवडीबद्दल भारत सरकार अखेरचा निर्णय घेईल.

**सुएझ कालव्याची सफाई**—गेल्या वर्षीं ब्रिटननें सुएझ कालव्यावर हल्ला केल्यावर कालव्यांत अडथळे उत्पन्न झाले आणि तो वाहतुकीस निरुपयोगी झाला. कालव्याची सफाई करण्यासाठीं संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें घेतलेल्या कर्जाची फेड करण्यासाठीं कालवा वापरणाऱ्या बोटी जो टोल देतात त्यावर आणखी ३ टक्के आकारणी करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे. टोलची रकम दरसाल सुमारें १० कोटी डॉलर्स येते.

# अर्थ

बुधवार, ता. १३ नोव्हेंबर, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताला मदत देणें अमेरिकेच्याच हिताचें

अमेरिकेंतील 'न्यूयार्क टाइम्स' ह्या प्रसिद्ध वृत्तपत्राच्या परदेशीय घडामोडींचे तज्ज्ञ मि. सुल्झबर्जर ह्यांनीं भारताला अमेरिकेनें कां मदत करावी आणि ती करणें अमेरिकेच्याच हिताचें कसें आहे ह्यासंबंधीं आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणतात कीं, भारतानें आर्थिक विकासाचा जो दीर्घकालीन कार्यक्रम आंखला आहे त्याला मदत करणें अमेरिकेच्या शहाण्या स्वार्थाच्या दृष्टीनेंसुद्धां इष्ट आहे. ही मदत करण्यासाठी अमेरिकन काँग्रेसकडे अधिक पैसा मागण्याचीहि गरज नाहीं. अधिक पैसा न मागतांहि थोडीबहुत मदत करतां येण्यासारखी आहे. अमेरिकेचे भारतामधील माजी वकील मि. शेरमन कूपर ह्यांनीं भारताला जरूर असणाऱ्या मदतींपैकीं बराच मोठा भाग देण्याची योजना तयार केली होती. त्यांनीं अशी सूचना केली होती कीं, अमेरिकेनें आपल्या जवळ शिल्लक असलेल्या शेतीच्या मालापैकीं १० कोटी डॉलर्स किंमतीचा माल भारताला विकावा. पण मालाची किंमत डॉलर्समध्यें न घेतां रुपयामध्यें घ्यावी. त्यामुळें भारताला आपल्याजवळील दुर्लभ परदेशीय चलन वांचवितां येईल. त्याचप्रमाणें १९५१ सालीं भारताला गहूं विकत घेण्यासाठी जें १०·८ डॉलर्स कर्ज देण्यांत आलें आहे त्याचेंहि रूपांतर रुपयांतील कर्जांत करण्यांत यावें. मि. कूपर ह्यांनीं सुचविलेली योजना जर अंमलांत आणण्यांत आली तर भारताच्या आंतरराष्ट्रीय पतींत सुधारणा होईल आणि आंतरराष्ट्रीय नाणेंनिधीकडून आणखी कर्ज मिळविणें भारताला सुलभ होईल. भारताला मदत करण्यांत आली नाहीं तर लोकशाही मार्गानें आधुनिक समाज उभारण्याचा मार्ग सोडण्याविषयीं लोकमताचा दाब वाढूं लागेल आणि त्या मार्गाऐवजीं कम्युनिस्ट चीनप्रमाणें हुकुमशाही मार्गाचा अवलंब करण्याच्या वृत्तीला साद मिळूं लागेल.

---

## भारताला ब्रिटनकडून झालेली मदत

फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे प्रतिनिधी मि. शटलवर्थ ह्यांनीं मुंबई येथें बोलतांना भारताच्या औद्योगीकरणास ब्रिटननें केलेल्या मदतीची माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, मि. न्यूबेरी नांवाच्या एका ब्रिटिश व्यापाऱ्यानें १५८४ सालीं अकबराच्या दरबारांत आपलें ओळखपत्र सादर केलें, तेव्हांपासूनच भारत व ब्रिटन ह्यांचा व्यापार सुरू झाला व हळूहळू वाढत गेला. आज भारत हा देश ब्रिटिश मालाची चौथ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे. पण कदाचित् ह्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, ब्रिटन हें भारताचें सर्वांत उत्तम गिऱ्हाइक बनलें आहे. १९५६ मध्यें भारतानें ब्रिटनपासून १६·७ कोटी पौंड किंमतीचा माल विकत घेतला. भारताच्या एकूण आयातीच्या एकचतुर्थांशापेक्षाहि ही आयात थोडी अधिक आहे. उलटपक्षीं, ब्रिटननें भारताकडून भारताच्या निर्यातीपैकीं एकतृतियांशापेक्षा अधिक निर्यात घेतली. त्याची किंमत १४·१ कोटी पौंड झाली. ह्या किंमतींत ६·९ कोटी पौंड चहाच्या किंमतीचे आहेत. ब्रिटनमधील लोक चहाऐवजीं कोकाकोला पिऊं लागले तर काय होईल, त्याची कल्पनाच करवत नाहीं. ब्रिटनमधून तंत्रज्ञांच्या पिढ्यांच्या पिढ्या भारतांत आल्या. नेपिअर आणि जेकब ह्यासारख्या ब्रिटिश एंजिनिअरांनीं कालवे काढून उत्तर भारताचा चेहरा बदलून टाकला. भाक्रा येथें सध्यां बांधण्यांत येत असलेलें धरण १९०८ सालीं सर लुइ डेन ह्या ब्रिटिश एंजिनिअरानें आपल्या मनःचक्षूंपुढें चितारलेलें होतें. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील सार्वजनिक विभागाला ब्रिटननें भरपूर सहकार्य दिलें आहे. खाजगी विभागांत १९५३ अखेर ब्रिटननें जवळ जवळ ४०० कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें आहे. तोंपर्यंत गुंतविण्यांत आलेल्या परदेशीय भांडवलापैकीं ८२ टक्के भांडवल ब्रिटिश होतें.

---

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें यश

दिल्ली विद्यापीठाचे उपकुलगुरु व सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशापयशाविषयीं आपले विचार प्रकट केले आहेत. हैद्राबाद येथें नाडहब्ब उत्सवसमितीपुढें बोलतांना ते म्हणाले कीं, लोकांनीं आपल्याकडून कांहीं प्रयत्न केल्यास दुसरी पंचवार्षिक योजना अपयशापासून वाचवितां येईल. त्याचप्रमाणें तिचा गाभा संपूर्णतया अंमलांत आणतां येईल. ह्या योजनेंत मूलभूत उद्योगधंदे, वाहतूक, औद्योगिक शक्ति, तांत्रिक शिक्षण, इत्यादि बाबतींत जीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत तींच योजनेचा गाभा आहेत. योजनेंतील उद्दिष्टें साध्य करण्यासाठी सुमारें ४,८०० कोटी रुपये खर्च करावे लागतील. भारतामधील लोकांनीं आपल्या जवळील पैशाची अधिक बचत करावी असे प्रयत्न सरकारनें केले; पण ते व्हावे तितके यशस्वी झाले नाहींत; कारण लोकांना योजनेसंबंधींची माहिती योग्य रीतीनें पुरविण्यांत आलेली नव्हती. शिवाय, लोकांमध्यें योजनेविषयीं पुरेशी जाणीवहि नव्हती. व्याजाचा दर वाढवून आणि तो अधिक आकर्षक करून बचतीचें प्रमाण वाढवितां येईल. पण त्यासाठीं आर्थिक विकासाची उपयुक्तता व महत्त्व ह्यांच्याबद्दल लोकांची जाणीव जागृत केली पाहिजे. शिवाय बचत करून जो पैसा सरकारला दिला जाईल त्याचा उपयोग उधळपट्टीच्या व नेत्रदीपक कामाकडे होणार नाहीं अशीहि दक्षता घेतली गेली पाहिजे. बचत आणि आर्थिक विकास ह्यांच्यामधील संबंध लोकांना समजावून सांगितले पाहिजेत. नियोजित अर्थव्यवस्थेंत नियंत्रणांची कशी जरूर आहे, ह्यासंबंधींहि लोकांना शिक्षण दिलें गेलें पाहिजे, आणि किंमती वाढूं लागल्यास त्या योग्य पातळीवर राखण्यासाठी प्रत्यक्ष उपाय योजण्याचें राजकीय धैर्यहि पाहिजे.

---

## आर्थिक व्यवहारांत नीतिमत्तेची आवश्यकता

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेची परिषद रोम येथें भरली होती. उपसंघटनेचे डायरेक्टर-जनरल श्री. विनय रंजन सेन ह्यांनीं परिषदेपुढें केलेल्या भाषणांत प्रगत राष्ट्रांना उद्देशून कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, सध्यां माणसांच्या मनांत अंतरिक्षांतील प्रवासांच्या स्वप्नांनीं गर्दी केली आहे. परंतु ह्याच वेळीं जगाच्या बऱ्याच मोठ्या भागांत दारिद्र्य आणि भूक ह्यांनीं आपला अंमल बसविला आहे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. जगांतील बहुसंख्य लोकांच्या भोंवतीं पडलेले दारिद्र्याचे पाश थोडेसुद्धां ढिले झालेले नाहींत. जगांत आज तांत्रिक क्रांतीची परिसीमा गांठली गेलेली आहे. तथापि, ह्या तांत्रिक प्रगतीमुळें आर्थिक व सामाजिक सुधारणा मात्र व्हावी तितकी झालेली नाहीं.

जगांतील शेतीचें उत्पादन हळूहळू वाढत आहे ही गोष्ट खरी आहे. पण, अजूनहि आपणांस खूपच अंतर कापावयाचें आहे. अविकसित देशांतील जनतेला समाधानकारक आहार पुरविण्याचें ध्येय अद्याप आपल्या दृष्टिपथांत आलेलें नाहीं. अर्थातच, अविकसित देशांतील शेतीचें उत्पादन वाढविण्याच्या आपल्या प्रयत्नांत कमजोरी येऊन चालणार नाहीं. आजच्या जगांत दारिद्र्य हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे हें आपण लक्षांत घेतलें तर सामान्य जनतेचें उत्पन्न वाढविणें व त्यासाठीं द्रुतगतीचे व समतोल विकास साधणारे उपाय करणें एवढा एकच मार्ग दारिद्र्यावरील तोडगा म्हणून शिल्लक रहातो. आर्थिक विकासाची प्रक्रिया जर बळकट पायावर उभी करावयाची असेल तर कांहीं प्रमाणांत तरी स्थैर्याची खात्री वाटली पाहिजे हें उघड आहे. कांहीं देशांत शेतीचा माल गरजेपेक्षा अधिक पिकल्यानें शिल्लक राहिलेला आहे. ह्या शिलकी मालाचें काय करावयाचें असा प्रश्न त्या देशांपुढें उभा रहातो. हा प्रश्न योग्य रीतीनें सोडवावयाचा असेल तर आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत नीतिनियमांची एखादी संहिता असला पाहिजे. शेतीच्या शिलकी मालाचा प्रश्न हा नाण्याच्या दुसऱ्या बाजूसारखा आहे. आज अशी परिस्थिति आहे कीं, जगांतील लक्षावधि लोकांना अधिक अन्न व इतर उपभोग्य वस्तू घेण्याची इच्छा आहे. पण त्यांच्याजवळ आवश्यक ती खरेदीशक्ति नाहीं. ज्या देशांत शेतीचा शिलकी माल पडून आहे त्यापैकी कांहीं महत्त्वाचे देश ह्या शिलकी मालाचा उपयोग करून अविकसित देशांचा आर्थिक विकास करण्याच्या योजना तयार करीत आहेत. अशा प्रकारच्या योजना दोन दृष्टींनीं फार उपयुक्त आहेत. जगाच्या ज्या भागांत आज आहाराची पातळी अतिशय खाली आहे तेथें शिलकी माल ह्या योजनांमुळें हलविला जाईल. शिवाय, कायम ठाण मांडून बसलेल्या दारिद्र्याविरुद्ध झगडा करण्यास व सुदृढ अर्थव्यवस्था निर्माण करून विटुस्त बाजारपेठा निर्माण करण्याच्या कामींहि त्यांची मदत होईल.

तथापि, वरील योजनांच्या द्वारें मदत घेणाऱ्या देशांतील उत्पादकांच्या गटांचें निष्कारण नुकसान होऊं न देण्यासाठी मदतीचे कार्यक्रम फार काळजीपूर्वक तयार करण्यांत आले पाहिजेत. असें झालें तरच मदत घेणाऱ्या व देणाऱ्या देशांना अशा योजना संपूर्णपणें हितकारक ठरतील; एरव्हीं त्यांच्यामुळें अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थेची हानि होण्याचा संभव आहे.

## राजाभाऊ केळकरांचें देहावसान !

मेसर्स केळकर बंधु यांचे एक ज्येष्ठ भागीदार व 'व्यापारी महाराष्ट्र'चे संपादक श्री. बाबूराव केळकर यांचे वडील बंधु श्री. भालचंद्र परशुराम ऊर्फ राजाभाऊ केळकर हे रविवार दि. १३ आक्टोबरला दीर्घ मुदतीच्या आजारानंतर आपल्या राहत्या घरीं कालवश झाले, हें कळविण्यास फार दुःख वाटतें.

कै. राजाभाऊंचा जन्म दि. १८ एप्रिल, १८९५ रोजीं झाला. प्राथमिक शिक्षण सटाणा येथें व इंग्रजी शिक्षण पुण्यास नूतन मराठी विद्यालयांत मॅट्रिकपर्यंत झालें व पहिल्या लढाईंत त्यांनीं मिलिटरी अकौंटसमध्यें नोकरी पत्करली. १९२२ सालीं त्यांचे धाकटे बंधु श्री. बाबूराव केळकर यांनीं स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. तेव्हां त्यांना मदत म्हणून कै. राजाभाऊ त्यांना येऊन मिळाले. तेव्हांपासून आजतागायत सुमारें पस्तीस वर्षे ते हा व्यवसाय व त्याचा सर्व व्याप अत्यंत धिमेपणें व कार्यकुशलतेनें सांभाळीत होते.

दिवसेंदिवस वाढत गेलेल्या या पसाऱ्यांत, प्रगतींत व यशांत कै. राजाभाऊंचा वाटा फार मोठा आहे. त्यांच्याच प्रोत्साहनानें नाशिक शाखा, लक्ष्मीरोडवरील यांत्रिक विभाग व पुण्यांतला केळकर प्रिंटिंग प्रेस सुरू झाला. या छापखान्याचा व्याप सध्यां धाकटे बंधु श्री. नारायणराव केळकर हे पाहतात. दैनंदिन व्यापांत कै. राजाभाऊ बैठक मारून बारकाईनें लक्ष घालीत म्हणूनच त्यांचे बंधु श्री. बाबूराव यांना पसारा वाढविण्यांत उमेद वाटली. 'व्यापारी महाराष्ट्र' हा एक त्यापैकीच व्याप होय. केळकर बंधूंच्या यशांत कै. राजाभाऊंच्या अबोल, प्रसिद्धिपराङ्मुख व सततच्या सहकार्यास सदैव तत्पर अशा कार्यक्षम व्यक्तिमत्त्वास फार मोलाचें स्थान आहे.

पुण्यांत स्थापन झालेल्या भारत इंडस्ट्रियल बँकेच्या स्थापनेंत त्यांचा पुष्कळ भाग होता व तेथें ते आरंभापासून आजारी पडेपर्यंत संचालकमंडळाचे सभासद होते. त्यांच्या निधनानें व्यापारी क्षेत्रांतली एक ठळक व्यक्ति सर्वांच्या नजरेपुढून हलविली गेली.

---

**गया येथें गौळवाडा**—बिहारच्या माहिती खात्याचे मंत्री श्री. दीपनारायण सिन्हा ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं गया येथें सरकारी मालकीचा गौळवाडा स्थापन करण्यांत येऊन दूधपुरवठ्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. अशा प्रकारचा गौळवाडा बिहारमध्यें पहिलाच होईल असें समजतें.

**सामुदायिक शेतीचा प्रयोग**—आंध्र सरकार आपल्या मालकीच्या ४३,००० एकर जमिनींत सामुदायिक शेतीचा प्रयोग करून पहाणार आहे. सुमारें २० ते ३० छोट्या सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत प्रयोग करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बँकांची आगामी परिषद

### लहान आकाराच्या बँकांचे दृष्टीनें महत्त्वाचे प्रश्न

[ लेखक—श्री. नी. ना. क्षीरसागर, मॅ. डायरेक्टर, दि भारत इं. बँक लि., पुणें ]

दि डेकन बँक्स असोसिएशन व पुणें बँकर्स असोसिएशन या दोन संस्थांचे विद्यमानें, नोव्हेंबर दि. २३ शनिवार व दि. २४ रविवार या दिवशीं मुंबई राज्यांतील मराठी भाषिक प्रांतांतील व त्या शेजारील भागांत कार्यक्षेत्र असणाऱ्या संयुक्त भांडवलाच्या (जॉइंट स्टॉक) बँकांची परिषद भरणार असल्याचें सर्वांस विदितच आहे. या परिषदेंत चर्चेस घेतल्या जाणाऱ्या विषयांचें महत्त्व व या परिषदेची फलश्रुति याकडे बँकिंग क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचे, तसेंच या विषयाशीं संबंधित लोकांचें लक्ष वेधलें जाणें सहाजिकच होय.

### पार्श्वभूमि

अशीच एक जॉइंट स्टॉक व सहकारी बँकांची संयुक्त परिषद सन १९५४ सालीं या दोन्हीं असोसिएशन्सतर्फे भरविण्यांत आली होती. त्या परिषदेंतील झालेल्या उपयुक्त चर्चेचा व विषयांचा गोषवारा पुस्तिकेच्याद्वारां असोसिएशन्सनीं प्रसिद्ध केला होता. ही आगामी परिषद जॉइंट स्टॉक बँकांचे पुरती जरी मर्यादित असली तरी या परिषदेस सहकारी बँकांचे चालकांनीं सुरुवातीपासूनच मनःपूर्वक सहकार्य दिलें आहे ही गोष्ट येथें नमूद करणें आवश्यक आहे. जॉइंट स्टॉक बँकांचें कार्यक्षेत्र व त्यांना लागणारे कायदेकानू व सरकारी नियंत्रणें, हीं सहकारी बँकांचे बाबतींत भिन्न असल्यानें या परिषदेंत जॉइंट स्टॉक बँकांचे अडीअडचणींचाच प्रामुख्यानें विचार व्हावा असा निर्णय दोन्हीं असोसिएशन्सच्या चालकांनीं घेतलेला असल्यानें चर्चेच्या विषयांची मांडणीहि त्यास अनुरूप अशीच असणें क्रमप्राप्त होय.

### स्वागताध्यक्ष, उद्घाटक व अध्यक्ष

वरील पार्श्वभूमि लक्षांत घेतां, ही भरणारी बँकांची परिषद ही "दुसरी परिषद" असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. या परिषदेचे स्वागताध्यक्ष डेकन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष तसेंच भारत इं. बँकेचे अध्यक्ष श्री. के. पां. जोशी वकील हे असून परिषदेचें उद्घाटन स्टेट बँक ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष श्री. न. वि. गाडगीळ हे करणार आहेत. परिषदेचें अध्यक्षस्थान टॅरिफ बोर्डाचे एक सदस्य डॉ. मुंरजन यांनीं विभूषित करण्यास संमति दिली असून परिषदेंतील चर्चेच्या विषयांना त्यांच्यासारख्या तज्ज्ञाचें मार्गदर्शन लाभलें आहे, हें परिषदेचें एक भाग्यच होय.

### परिषदेचे घटक आणि चर्चेचे विषय

या परिषदेंत मराठी भाषिक व त्या शेजारील भागांत कार्यक्षेत्र असणाऱ्या व ज्यांचें भांडवल प्राधान्येंकरून या भागांत उभारलें गेलें आहे अशा सुमारें ३३ बँका भाग घेणार असून त्यांचें या प्रदेशांत खेळतें भांडवल सुमारें २५ कोटींचे अवळपास गुंतलेलें आहे. या बँकांतील बऱ्याचशा बँका आकारानें लहान असून बँकिंग कायदा, कंपनी कायदा व इतर प्रचलित लागूं होणारे कायदे यामुळें त्यांच्या दैनंदिन अडचणींना सामुदायिक चर्चेनें कांहीं मार्ग निघणें शक्य होईल किंवा कसें, याच दृष्टीनें बँकांनीं आपआपले प्रश्न चर्चेसाठीं पाठविले आहेत. या प्रश्नांतील विषयांची छाननी करतां त्यांचे तीन विभाग पडूं शकतील:—१ सरकारी कायदेकानू. २ बँकांनीं एकमेकांच्या सहकार्यानें सोडविण्याचे धंद्यासंबंधीं प्रश्न. ३ प्रांतांतील बँकिंगव्यवसायाची वाढ कशी होईल. अशा या तीन स्थूलमानानें पडणाऱ्या विभागांतून ही चर्चा झाल्यास त्या व्यवसायांतील कार्यकर्त्यांनाच नव्हे तर रिझर्व्ह बँक व मध्यवर्ती अर्थविषयक धोरण ठरविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनाहि विचारास चालना देण्याच्या दृष्टीनें उपयुक्त होईल यांत शंका नाहीं.

### सरकारी धोरणाची अनिश्चितता

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत देशांतील इतर सर्व व्यवसायांचा विचार होऊन सरकारी धोरणाचा खुलासा मिळूं शकतो; परंतु देशांतील अर्थव्यवस्थेंत ज्यांचा प्रामुख्यानें संबंध येतो अशा जॉइंट स्टॉक बँकांचे संबंधींचें सरकारी धोरण काय आहे याचा विचार या योजनेंत झालेला आहे, असें आमचें वाचण्यांत आलेलें नाहीं. अशा या सरकारी धोरणाच्या संदिग्ध परिस्थितीमुळें बँकिंगच्या व्यवसायांत कांहीं अंशीं संभ्रम उत्पन्न झाला असल्यास नवल नाहीं. आपल्या देशांतील बँकिंगची व्यवस्था ब्रँच बँकिंगची असावी अथवा 'युनिट बँकिंग' असावी अथवा संमिश्र असावी, ती मध्यवर्ती संस्थेची असावी किंवा प्रांतानिहाय असावी, अशा प्रश्नांसंबंधीं धोरण निश्चित नसल्यानें अस्तित्वांत असलेल्या लहान लहान बँकांना आपली स्वतःची मजबुती वाढवून सरकारी कायदेकानूंचे नियंत्रणांत कसें बसतां येईल याकडे त्यांचें लक्ष केंद्रित झाल्यास नवल नाहीं.

### लहान बँकांपुढील कायदेविषयक अडचणी

लहान आकाराच्या बँकांना कायदेविषयक अडचणींचा विचार प्रामुख्यानें पुढीलप्रमाणें करावा लागेल असें दिसतें.

१ उत्पन्न-प्राप्तीकरांतील सवलत. २ कोर्टांतील हुकुमनाम्यांतून दिल्या जाणाऱ्या लहान हप्त्यांच्या कर्जदारास मिळणाऱ्या सवलती, तसेंच व्याजाचे दरांतील कपात. ३ बँकांना लागूं असणाऱ्या (अ) इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट (ब) इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस् ॲक्ट (क) शॉप एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट या तीन कायद्यांपैकी कोणताहि एक लागूं करणें अथवा बँकांचेसाठीं स्वतंत्र एक कायदा नवीन करणें. ४ शिडयूल्ड व नॉन-शिडयूल्ड हा बँकांतील भेद काढून टाकणें. ५ सर्व बँकांना 'परवाने' देणें.

### परस्पर-सहकार्यानें सुटणारे प्रश्न

बँकांच्या सहकार्यानें सोडवितां येणारे विषय पुढीलप्रमाणें राहातील असें म्हणावयास हरकत नाहीं.

१ क्लिअरिंग हाऊस सभासदत्व सर्वांना देणें अथवा नॉन शिडयूल्ड बँकांना सब्-मेंबर करून घेण्याची सोय करणें. २ क्लिअरिंग हाऊसबाबत बँकांना जी रोख रक्कम ठेवावी लागते (बिनव्याजीं) त्याऐवजीं तितक्या रकमेचे सरकारी कर्जरोखे ठेवण्याची सोय करणें. ३ बिलांचे री-डिस्कौंटिंग. ४ कमिशनचे, ठेवींचे दर सर्वांना पोषक होतील असे ठेविण्याचा प्रयत्न करणें. ५ शक्य त्या ठिकाणीं अनिष्ट चढाओढ शाखा न काढतां टाळणें, वगैरे. आणखी कांहीं बाबींहि समाविष्ट होऊं शकतील.

बँकिंगव्यवसायाची या प्रांतांत वाढ होऊन त्या अधिक कार्यक्षम कशा होतील, तसेंच बँकांची मजबुती कशी वाढवितां येईल या दृष्टीनेंहि महत्त्वाची चर्चा होणें इष्ट आहे.

### बँकांचें 'ॲफिलिएशन'

कलकत्ता येथील युनायटेड बँक ऑफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. के. दत्त यांनीं, इंडियन्स बँक्स असोसिएशनमार्फत, देशांतील बँकिंगची व्यवस्था कशी असावी अशासंबंधीं एक योजना पुस्तकरूपानें प्रसृत केली होती (Necessity for a

Banking Plan ) त्या योजनेतील सर्वच भाग जरी आपल्या परिस्थितीशीं जुळता नसला, तरी इंडियन बँक्स-असोसिएशनचे माजी अध्यक्ष के. प्राणलाल देवकरण यांनीं आपले एका भाषणांत प्रस्थापित केलेल्या 'बँकांचे ॲफिलिएशनची' योजना आपल्या इकडील लहान आकाराच्या बँकांना विचारार्ह ठरेल यांत शंका नाहीं. देवकरण नानजी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रविणचंद्रजी गांधी यांनींहि 'रोटरी क्लब' पुणें-या संस्थेंत 'स्वातंत्र्योत्तर कालांतील बँकांची प्रगति' या विषयावर जे विचार-परिप्लुत असे विचार व्यक्त केले, [ पहा : "अर्थ"-दि. २३ आक्टोबर, ५७ ] त्यांतहि 'बँकांचे ॲफिलिएशन'चा मुद्दा प्रामुख्यानें मांडला होता. या ॲफिलिएशनच्या-बँकांनीं संलग्न-होण्याच्या दृष्टीनें तपशीलवार योजना करण्यासाठीं या परिषदेनें विचार केल्यास लहान आकाराच्या बँकांचे प्रश्न व त्यांची कार्यक्षमता वाढविण्यास निश्चित मदत होईल.

### ॲफिलिएशनच्या योजनेचें स्वरूप

बँका संलग्न करणें-ॲफिलिएशन ऑफ बँक्स-या मुद्याचें विशेष तपशीलवार स्पष्टीकरण जरी येथें करण्याचें योजिलेलें नाहीं तरी स्थूलमानानें तें आपणांपुढें ठेविल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. सोयीप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें लहान आकाराच्या बँकांचा तीन अथवा चारचा गट तयार करून त्या (गटानें) बँकांना आपलें स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून एक मोठ्या शिड्यूल्ड (लायसेन्स्ड) बँकेशीं संलग्न होणें. या मोठ्या बँकेच्या मदतीनें व धोरणानें या लहान आकाराच्या बँकांनीं आपला कारभार पाहावयाचा. अर्थात् अशा संलग्न करून घेणाऱ्या बँकांचें नांव, त्यांचें भांडवल, त्यांची मदत लहान आकाराच्या बँकांना मिळणार असल्यानें त्यांनींहि संलग्न करून घेणाऱ्या बँकेचें नियंत्रण व धोरण यांस मान्यता देणें आवश्यक ठरेल. अशा या नियंत्रणाखालीं व मोठ्या बँकांच्या मदतीनें लहान आकाराच्या बँकांना आपले व्यवहार सुधारण्यास, एकंदर नफा वाढविण्यास, भागिदारांना नफा देण्यास त्या कांहीं वर्षांत कार्यक्षम होऊं शकतील असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अशी ही संलग्नतेची हितावह योजना करण्यासाठीं परिषदेनें एक 'तज्ज्ञांची समिति' नेमून बँकांच्या संलग्नतेचा आराखडा रिझर्व्ह बँकेशीं विचार-विनिमयानें तयार केल्यास या परिषदेनें लहान आकाराच्या बँकांच्या दृष्टीनें भरीव कार्य केलें असें मानावयास हरकत नाहीं.

वरील लेखांत कांहीं ठिकाणीं जर मतप्रदर्शन झालें असेल तर तें लेखकाचें व्यक्तीगत मत आहे असें समजावें, या लेखाशीं कोणत्याहि संस्थेच्या मताचा संबंध नाहीं, हें येथें नमूद करणें इष्ट आहे.

---

**मूलोद्योग शिक्षणाचा प्रचार**—भारतांत मूलोद्योगी शिक्षण-पद्धतीचा प्रचार करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण व संशोधनखात्यातर्फे एक तिमाही नियतकालिक प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. नियतकालिक हिंदी व इंग्रजी भाषांतून प्रसिद्ध होईल. त्याचा पहिला अंक पुढील वर्षाच्या जानेवारी महिन्यांत प्रसिद्ध होईल.

**ग्राहकांची सहकारी चळवळ**—अखिल भारतांत पाळण्यांत आलेल्या सहकार सप्ताहाच्या निमित्तानें मुंबईत रशिआंतील ग्राहकांच्या सहकारी चळवळीची माहिती देणारें एक प्रदर्शन इंडो-सोव्हिएट सांस्कृतिक सोसायटीतर्फे भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत ग्राहकांच्या सहकारी चळवळीच्या महत्त्वाच्या अंगाचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे.

## सुसंस्कृत व सुधारक दृष्टिकोन*

### "तुमचें स्थान कोणतें ?"

दैनंदिनीच्या चाकोरींतून संसाराचा गाडा हाकणाऱ्या कुटुंबीयांच्या वाटचालींत कळत न कळत कित्येक वैगुण्यें निर्माण होऊन जीवनामध्यें तीं सुखाच्या ऐवजीं दुःखास कारण होत असतात. आपल्या लेखांतून अशा वैगुण्यांची सहृदयतेनें छाननी करून ही वाटचाल सुखद होण्याकरितां दीपावलीच्या सुमुहूर्तावर लेखकानें एक 'दीपमालाच' लावून ठेविली आहे. त्यामुळें व्यक्तिमात्रालाच नव्हे तर परिस्थितीच्या रगाड्यांत सांपडलेल्या समाजाला व राष्ट्रालाहि चुकल्या दिशेची जाणीव होऊन, योग्य दिशा कळण्यास नेहमींच मदत होत राहील.

'मधुचंद्राच्या' उन्मादांत वस्तुस्थितीस विसरून मनोराज्यें न करण्याचा इषारा देऊन 'दांडीवरील धुण्या'मधून विटल्या जीवनांत घरांतून खासगी पेहराव करतांनासुद्धां स्त्रियांच्या मनोभावनांना धक्का न देतां सौंदर्यदृष्टि बाळगून जीवनांत उल्हास निर्माण करणें कसें निकडीचें आहे, हें विशद करून सांगितलें आहे. 'खोट्या प्रतिष्ठेला बळी' पडण्याचा मोह आवरून कौटुंबिक जीवनांत कामसू व काटकसरी मनुष्यच खरें हित साधत असतो हें सांगतांना, समाजानें व राष्ट्रानें म्हाताऱ्या झाडूवाल्याच्या हातांत ओंखूड खराटा देऊन भलतीच काटकसर करण्यांत माणुसकीचा अभाव कसा दिसून येतो या बाबीवर विदारक प्रकाश टाकला आहे. सुशिक्षित व स्वावलंबी स्त्रियांच्या बाबतींतील साधारण समाजाचा दृष्टिकोन तर्कशुद्ध नसल्याचें दाखवितांना सुखाचीं लक्षणें म्हणजे ताबेदारीमुळें निर्माण झालेली सामसूम व शांतता नव्हे, याचें योग्य दिग्दर्शन केलें आहे.

सर्व लेखांमधून एक सुसंस्कृत व सुधारक दृष्टिकोन स्पष्ट होत असून जीवन सुखी व समृद्ध करण्याचा मार्ग दाखविण्याची कळकळ स्पष्ट होते. भाषा साधी असूनहि जागोजागीं सुंदर उपमांतून काव्य विखुरल्याचा भास होऊन प्रसंगांच्या उल्लेखामुळें प्रचीतीचा आल्हाद वाचतांना लाभत असतो. मानवी मनोव्यापारांचें विश्लेषण अचूक व मार्मिक असून लेखकाच्या तिन्ही पुस्तकांच्या नांवामधूनहि एकसूत्रीपणा दिसून येऊन एक स्फूर्तिप्रद संदेश त्यांतून पाठविलेला आहे. 'कणांतून व क्षणांतून' जीवनांत 'पुढे पाऊल' टाकत असतां 'तुमचें स्थान कोणतें?' याचा तुम्ही विचार करीत असावें व प्रत्येकाच्या कार्सेतील 'लाख मोलाच्या भांडवला'चा आढावा काढीत राहणें आवश्यक आहे. अन्य भाषांतूनहि लेखकाच्या या पुस्तकांचीं भाषांतरें लोकप्रिय होत आहेत यावरूनहि त्यांच्या लिखाणाचें वैशिष्ट्य स्पष्ट होत असून त्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन.

'लताकुंज',
बेळगांव.

गो. वि. सराफ

---

*तुमचें स्थान कोणतें ? लेखक : श्री. वा. काळे पृ. सं. १२०. किं. २ रु.

---

**भारताची वाढती लोकसंख्या**—अमेरिकेच्या व्यापारखात्यानें अशी माहिती जाहीर केली आहे कीं, जगांतील एकूण लोकसंख्येपैकी सुमारें निम्मी लोकसंख्या अमेरिका, रशिआ, चीन व भारत ह्या देशांत आहे. लोकसंख्येच्या बाबतींत भारताचा अनुक्रम चीनच्या खालीं लागतो. भारताची लोकसंख्या ३८ कोटी आहे. १९५९ च्या सुमारास ती ३९ कोटी होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

# सोन्याची भारतांतील चोरटी आयात

## (१)

भारताच्या अर्थव्यवस्थेंत सोन्याला परंपरागत महत्त्व प्राप्त झालेलें आहे, ही गोष्ट गेल्या नव्वद वर्षांच्या कालांतील सोन्याच्या आयातीचे व निर्यातीचे जे आंकडे उपलब्ध आहेत त्यावरून दिसून येते. लोक आपल्या बचतींपैकी कांहीं भाग सोन्याची खरेदी करण्यांत नेहमींच खर्च करीत असत. सोन्याचा सांठा करण्यासाठी जी मागणी असे ती भारतांतील सोन्याच्या खाणींतून निर्माण होणाऱ्या सोन्यांतून अत्यल्प प्रमाणांतच भागण्यासारखी होती. त्यामुळें ह्या मागणीचा सर्वांत मोठा हिस्सा भारताच्या आयात-निर्गतीच्या वाढाव्यापैकी कांहीं भागाचें सोन्यांत रूपांतर करून भागविला जात असे. १९३०-३१ अखेर संपणाऱ्या ४५ वर्षांच्या काळांत दरसाल सरासरी २२ लाख औंस अथवा ५८.६ लाख तोळें सोनें आयात करण्यांत येत होतें. सार्वत्रिक आपत्तीचा काळ सोडला तर कुटुंबाच्या अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करण्यासाठी सोनें विकण्याचा प्रसंग क्वचितच येई. अशा वेळीं सोन्याची निर्यात होई. १९३०-३१ नंतरचीं १२ वर्षें अशा प्रकारच्या सार्वत्रिक आपत्तींचीं होतीं.

अगदीं जरूरीचा माल आयात करण्यास विदेशी हुंडणावळ हाताशीं असावी, ह्या हेतूनें १९३९ सालीं सप्टेंबर महिन्यांत सोन्याच्या आयातीस बंदी करण्यांत आली. परंतु त्यामुळें लोकांच्या हाडींमासीं भिनलेल्या जुन्या संवयी एकदम नाहींशा होणें शक्य नव्हतें. ग्रामीण भागांतील लोकांच्या आर्थिक परिस्थितींत जसजशी सुधारणा होत गेली तसतशी १९४३-४४ मध्यें सोन्याच्या वाढ आयातीची मागणी पुन्हां होऊं लागली. १९४३ ते १९४५ ह्या तीन वर्षांच्या कालांत ही मागणी दोस्त राष्ट्रांच्या सरकारांनीं सोन्याची आयात करून व ती विकून बऱ्याच प्रमाणांत पुरविली. ह्या काळांत आपला रुपयांतील खर्च भागविण्यासाठी सरकारनें ७१ लाख औंस सोन्याची आयात केली. त्यानंतर सोन्याचा साठा करण्यासाठी जी मागणी असे ती सर्व सोनें बेकायदा व गुप्त रीतीनें आयात करून भागविण्यांत येत आहे. सोन्याची देशांतील किंमत आणि त्याची देशाबाहेरील किंमत ह्यांच्यांतील फार मोठ्या तफावतीमुळें सोन्याची बेकायदा गुप्त आयात शक्य झाली आहे. ह्या किंमतींत अंतर्गत बाजारांतील परिस्थितीमुळें व रुपयांच्या परदेशीय हुंडणावळींतील मूल्यामुळें वेळोवेळीं फरक होतात. १८ सप्टेंबर, १९४९ पर्यंत सोन्याच्या औंसाची भारतांतील किंमत ४३.४२ रुपये होती. त्यानंतर ती ६२.५० रुपये झाली. भारताच्या रुपयाचा परदेशी हुंडणावळीचा दर कृत्रिम असल्यामुळें चोरट्या सोन्याच्या व्यापारांत त्या लोकांना चांगलाच फायदा होतो. सध्यां भारतांत सोन्याच्या एक तोळ्याची सरासरी किंमत १०८ रुपये आहे. चोरट्या सोन्याच्या हिंदी व्यापारांत तो करणाऱ्यांना दर तोळ्यामागें ४५.५० रुपये ठोक नफा होतो.

बेकायदा सोन्याची आयात थांबविण्यास पोलिसांना मदत व्हावी म्हणून १९५५ च्या एप्रिलमध्यें सी कस्टम्स ॲक्टमध्यें दुरुस्ती करण्यांत आली. पोलिसांना एखाद्या व्यापाऱ्याचा संशय आला आणि त्यांनीं त्याच्याजवळचें सोनें जप्त केलें तर हें सोनें चोरट्या मार्गानें आपल्याजवळ आलेलें नाहीं हें सिद्ध करण्याची जबाबदारी त्या व्यापाऱ्यावर टाकण्यांत आली. पण त्यामुळें मुंबई बाजारांतील सोन्याच्या किंमतींवर फारसा परिणाम झाला नाहीं. कायदा दुरुस्तीमुळें चोरट्या सोन्याच्या आयातींत फरक पडेल असें बाजारांत कोणालाच वाटलें नाहीं. चोरट्या सोन्याच्या आयातीचा अंदाज अप्रत्यक्ष माहितीवर आधारलेला आहे. चोरट्या सोन्याचा कस (९९.९ टक्के) हा भारतामधील सोन्याच्या कसापेक्षा अधिक असल्यामुळें, त्या सोन्याचा कस कमी करावा लागतो. नाहींतर तें उघडकीस येतें. भारतामधील बाजाराच्या पद्धतीप्रमाणें ९९.० टक्के कसाच्या वरील सर्व सोन्याला एकाच दरानें किंमत देण्यांत येते. त्यामुळें वरकड कसाचा फायदा उठविणें, सुरक्षिततेचा प्रश्न सोडून दिला तरी, हिताचें होतें. शिवाय कस उतरविणें भारतामधील परिस्थितीच्या दृष्टीनेंहि जरूर होते. कारण गिनीगोल्डचा कस ९१.७ टक्के असतो व त्याची मागणी दक्षिणेंत होते. ९७.० टक्के कसाच्या पिवळ्या सोन्याला इतरत्र मागणी असते. १९५५ मध्यें सी. कस्टम्स ॲक्टमध्यें दुरुस्ती होण्यापूर्वी चोरटें सोनें कस उतरविण्यासाठीं तें वितळविणाऱ्या भट्टयांकडे पाठविण्यांत येत असे. त्यामुळें चोरट्या सोन्याचा अंदाज ठोकळ मानानें बांधतां येत असे. ह्या अंदाजावरून असें दिसतें कीं १९५५ अखेर संपलेल्या ८ वर्षांच्या काळांत सुमारें ३३ लाख तोळे सोनें दरसाल गुप्त मार्गानें आयात केलें जात होतें. सध्यांच्या किंमती लक्षांत घेतल्या तर त्याची किंमत ३६ कोटी रुपये होईल. तथापि, ह्यावरून खऱ्या परिस्थितीची कल्पना येत नाहीं. एकतर छोट्या खाजगी भट्टयांतून वितळण्यांत येणारें सोनें ह्या अंदाजांत धरलेलें नाहीं. शिवाय जें चोरटें सोनें न वितळतां विकलें जात होतें त्याचाहि हिशेब त्यांत केलेला नाहीं. चालू शतकाच्या दुसऱ्या दशकांत भारतांत दरसाल सरासरी ४० लाख औंस सोनें आयात करण्यांत येत होतें. त्यानंतर ब्रह्मदेश व पाकिस्तान भारतापासून वेगळे झाले. तथापि भारतामधील ग्रामीण लोकांची आर्थिक परिस्थिति तेव्हांपासून थोडीबहुत सुधारली आहे. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत १६२ कोटी रुपये किंमतीचें चोरटें सोनें भारतांत आलें, असा अंदाज आहे. कार्यक्रमासाठीं जितके परदेशीय चलन वापरण्यांत आलें त्याच्या ८० टक्क्यांइतकी ही रकम आहे. ह्याच काळांत देशांत जी अंतर्गत बचत करण्यांत आली तिच्या ६ टक्के आणि जगांतील सोन्याच्या सांठ्याच्या १४ टक्के इतकी मोठी ही रकम आहे.

---

**पोलादाच्या कारखान्यांसाठी नौकर**—रूरकेला, भिलई व दुर्गापूर ह्या ठिकाणीं काढण्यांत येणारे पोलादाचे कारखाने चालविण्यासाठीं तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कुशल नौकरांची आवश्यकता आहे. कारखान्यांतून काम करण्यासाठी २,००० एंजिनिअर्स व १६,००० कुशल कामगार शिकवून तयार करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें आखली आहे.

**ऑल इंडिआ सायन्स कॉंग्रेस**—ऑल इंडिआ सायन्स कॉंग्रेसचें २७ वें वार्षिक अधिवेशन जबलपूर येथें ता. २६ व २७ डिसेंबर ह्या दोन दिवशीं भरणार आहे. अधिवेशनाला भारताच्या निरनिराळ्या भागांतून विख्यात शास्त्रज्ञ येणार आहेत. अधिवेशनांत सुमारें ८० शास्त्रज्ञ भाग घेणार आहेत. अधिवेशनाचें उद्घाटन डॉ. मुदलिआर करणार आहेत.

## नूतन मराठी विद्यालय, प्रशाला, पुणें नियतकालिक

### स्वातंत्र्य समर शताब्दी विशेषांक

पुण्यांतील नूतन मराठी विद्यालय या प्रशालेचीं अनेक वैशिष्ट्यें आहेत. मराठी भाषेंतून प्रौढ विद्यार्थ्यांसाठी चालविलेल्या कांहीं नियतकालिकांच्यापेक्षा गुणांच्या बाबतींत या नियतकालिकांचे विशेषांक श्रेष्ठ दर्जाचे ठरले आहेत. लो. टिळक जन्मशताब्दी-निमित्त निघालेला या नियतकालिकाचा विशेषांक व त्यांतील चित्रमय दर्शनभाग अत्यंत आकर्षक व नाविन्यपूर्ण होता. १८५७ च्या समर-शताब्दीनिमित्त निघालेला हा विशेषांकहि विविध कुशल लेखकांनीं व कवितांनीं नटलेला आहे. इयत्ता ९, १० व ११ वींतील विद्यार्थ्यांचे हे अभ्यासपूर्ण व वाचनीय लेख वाचले म्हणजे भावी मराठी लेखकांविषयीं उत्कट आशावाद निर्माण होतो. त्यांनीं रेखाटलेलें क्रांतिवीरांचें व समरसंघर्षाचें शब्दचित्र सुरेख व कौशल्यपूर्ण सजावटीचें वाटतें. १८५७ च्या नंतर झालेल्या विविध क्रांतिकारक घटना व क्रांतिवीरांचीं चरित्रें यांत समाविष्ट करून नियतकालिकाच्या संपादकांनीं आपली मार्मिक ऐतिहासिक दृष्टि व्यक्त केली आहे. बहुतेक लेखांतील भाषा प्रसन्न व सुबोध असून वर्ण्यविषयांशीं लेखक तादात्म्य पावलेला आहे, असें पदापदीं दिसून येतें. फारसा विस्तार न करतां सरळ व सुबोध भाषाशैलींत लिहिलेली क्रांतिवीरांचीं चरित्रें हें या नियतकालिक विशेषांकाचें एक विशेष आकर्षण झालें आहे.

विशेषांकाच्या मुखपृष्ठावरील झांशीच्या राणीपासून तों जवाहरलाल नेहरूपर्यंतच्या क्रांतिवीरांची चित्रमाला या अंकाच्या उठावदारपणांत भरच घालणारी आहे. असा सुंदर व संग्राह्य अंक प्रकाशित केल्याबद्दल आम्ही या प्रशालेच्या नियतकालिकाचें संपादक मंडळ व विद्यार्थी लेखक मंडळ यांचें अभिनंदन करतों.

## दी विटें मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटें.

चेअरमन : रामचंद्र बळवंत दिवटे.

मॅनेजर : गोपाळ रामकृष्ण ब्रह्मनाळकर, एलएल. बी.

वृत्तांताचे सालीं बँकेच्या भक्कमपणाचा सूचक अशी, ठेवी मिळालेलें व्याज, खेळतें भांडवल व उलाढाल यांमधील वाढहि नजरेंत भरण्याइतकी मोठी आहे असें दिसून येईल. ठेवीवरील वाढ ही बँकेवर ठेविदारांचा विश्वास वाढत असल्याचेंच द्योतक आहे. वृत्तांताचे सालीं बँकेनें ४% मुंबई स्टेट डेव्हलपमेंट लोन १९७० मध्यें रु. ७५,००० गुंतवले आहेत. कर्जांत जरी थोडी वाढ दिसत असली तरी सहकारी खात्याला अभिप्रेत असणाऱ्या मर्यादेपर्यंत आणणेबाबत संचालक मंडळ प्रयत्न करीत आहे. अहवालसालीं थकबाकीचें एकंदर कर्जांशीं प्रमाण (कर्ज बूड फंड वजा जातां) १०.१% असून गेलें सालपेक्षां हें प्रमाण चार टक्क्यांनीं कमी झालेलें आहे.

अहवालाचे सालीं बँकेची थकबाकी जरी थोडी कमी झाली असली तरी जितकी कमी होत आहे तितकीच नवीन थकबाकी वाढत आहे असें बोर्डाला खेदानें नमूद करावें लागत आहे व त्यामुळें व्यवस्थापक मंडळाला लवादासारखे उपाय योजावे लागत आहेत. बँकेच्या व्यवहाराबाबत नियमितपणाचें व व्यवस्थितपणाचें पथ्य सांभाळणें अत्यंत अगत्याचें असतें व यावरच बँकेची प्रगति अवलंबून आहे असें अहवालांत म्हटलें आहे.

चालू सालीं बँकेचे स्टाफपैकीं श्री. बाळकृष्ण गोविंद महाजनी हे "हायर डिप्लोमा इन को-ऑपरेशन" मध्यें पहिल्या वर्गांत व 'जी. डी. सी. ए.' मध्यें दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले आहेत हें नमूद करणेस बोर्डास आनंद होत आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. वृ. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. चंदुके. |

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

## हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

| | |
|---|---|
| श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष) |

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.